राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाकडील पीआयपी मधील प्राप्त अनुदानातून राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये AERB Compliance करण्यासाठी (Empanelment of Agency for Providing Atomic Energy Regulatory Board Certification (AERB) Facilitation on Turnkey Basis) बाह्य संस्था नियुक्त करण्याच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२१८/प्र.क्र.६७०/आरोग्य-७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/आयपीएचएस/७६१५२-१५५/१८, दिनांक ०६ डिसेंबर, २०१८.
२) सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय) राज्यस्तर, मुंबई यांच्याकडील पत्र क्र.राआसो/आयपीएचएस/AERB/५०८६७-८६९/२०१९, दिनांक २० ऑगस्ट, २०१९.
३) सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/आयपीएचएस/AERB/०५४५१-४५३/२०१९, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९.
४) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची मान्यता दिनांक ०४ डिसेंबर, २०१८ व दिनांक १९ जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ व २०१९-२० च्या मंजुर पीआयपीनूसार मंजुर झालेल्या अनुदानातून राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये AERB Compliance करण्यासाठी (Empanelment of Agency for Providing Atomic Energy Regulatory Board Certification (AERB) Facilitation on Turnkey Basis) बाह्य संस्था नियुक्त करण्याच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

राज्यातील आरोग्य संस्थांमधील उपलब्ध असलेल्या रेडिएशन उत्र्सजन करणाऱ्या X-Ray Machin Fixed and Portable, CT Scan, Dental X-Ray Machine, C-Arm Machine इत्यादी उपकरणांच्या AERB Norms प्रमाणे Compliance करण्यासाठी व आरोग्य संस्थांना AERB कडून परवाना (License) मिळवून देण्यासाठी (Empanelment of Agency for Providing Atomic Energy Regulatory Board Certification (AERB) Facilitation on Turnkey Basis) बाह्य संस्था नियुक्त करणे आवश्यक आहे. त्याकरीता अंदाजित रु.९८२.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ मध्ये रु.८८२.०० लक्ष (FMR Code ६.१.१.२५.a) अनुदान AERB Registration of all applicable Radiologist Machine अंतर्गत उपलब्ध असून सदरचे अनुदान सन २०१९-२० या वर्षाकरीता कमिटेड ठेवण्यात आलेले आहे. तसेच अतिरिक्त आवश्यक अनुदान रु.१००.०० लक्ष सन २०१९-२० FMR Code ६.१.१.२५.a मधून भागविण्यात येणार आहे. त्यानूसार राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये AERB Compliance करण्यासाठीच्या बाह्य संस्था नियुक्त करण्यासाठीच्या रु.९८२.०० लक्ष रकमेची निविदा प्रक्रिया करण्याकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय) राज्यस्तर, मुंबई यांनी शासनास सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या रेडिएशन उत्सर्जन करणाऱ्या उपकरणांच्या संदर्भात आवश्यक AERB Compliance साठी बाह्य संस्था नियुक्त करण्याकरीताच्या (Empanelment of Agency for Providing Atomic Energy Regulatory Board Certification (AERB) Facilitation on Turnkey Basis) निविदा प्रक्रियेस खालील विवरणपत्रास पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विवरणपत्र

Sr. No.	FMR Code	Description	Approved Amt. In Lakhs	Empanelment of Agency for AERB Compliance Proposal Rs. in Lakhs
1	2018-19 FMR Code 6.1.1.25.a Committed Rs.882.00 Lakhs and 2019-20 FMR Code 6.1.1.25.a Rs.100.00 Lakhs	AERB Registration of all applicable Radiological Machines	982.00	982.00

अटी :-

१) सदर AERB Compliance (Empanelment of Agency) सेवेची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदर AERB Compliance सेवेचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) नेमण्यात येणाऱ्या संबंधित बाह्य संस्थांकडून करावयाची कामे, देण्यात येणारा मोबदला, पर्यवेक्षण पडताळणी, कराराच्या अटी शर्ती याबाबत सर्व अटींचा निविदा दस्तऐवजात समावेश करण्यता यावा व त्यांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

५) सदरहू बाबीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून सन २०१८-१९ साठी उपलब्ध करुन दिलेल्या तसेच कमिटेड असलेल्या FMR Code ६.१.१.२.५.a अंतर्गत रु.८८२.०० लक्ष व सन २०१९-२० FMR Code ६.१.१.२.५.a अंतर्गत रु.१००.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.९८२.०० लक्ष इतक्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची निविदा प्रक्रिया प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

६) तसेच, या बाबींच्या सेवेंची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यक्रम प्रमुखांची राहील.

७) संपूर्ण निविदा प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान AERB पूर्ततेसंदर्भात विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन कार्यक्रम प्रमुख करतील याची दक्षता घ्यावी.

८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ८ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201909161904428717 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Milind Raghunath Kulkarni

Digitally signed by Milind Raghunath Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=438fa70bb728385b5c81bde24450c11d5ce0d99ed18a61fb5b1685722e2c2c03, cn=Milind Raghunath Kulkarni
Date: 2019.09.18 12:05:51 +05'30'

(मिलिंद कुळकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)